डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया पुणे संचलित

डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाणिज्य व महर्षी शिंदे कला महाविद्यालय

(वरिष्ठ / कनिष्ठ व व्यावसायिक शिक्षण)

"अहिल्याश्रम", ८९६, नाना पेठ, पुणे ४११ ००२.
टेलीफॅक्स : ०२० - २६३५०८५७

नॅक मूल्यांकन "बी"

माहिती पत्रक

२० - २०

डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया पुणे संचलित

डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाणिज्य व महर्षी शिंदे कला महाविद्यालय

(वरिष्ठ / कनिष्ठ व व्यवसाय शिक्षण)

"अहिल्याश्रम", ८९६, नाना पेठ, पुणे ४११ ००२.
टेलीफॅक्स : ०२० - २६३५०८५७

● नॅक मूल्यांकन "बी" ●

● माहिती पत्रक ●

२० - २०

* महाविद्यालयाविषयी थोडेसे *

डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाणिज्य व महर्षी शिंदे कला महाविद्यालय डिप्रेस क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया पुणे या संस्थेच्या वतीने चालविले जाते. सामाजिक व सांस्कृतिक क्रांतीचे पर्व सुरु करण्याचा आद्य मान मिळालेल्या पुणे नगरीत शिक्षण प्रसाराचे काम ही बाब भूषणावह मानली जाते. थोर समाजसुधारक वि. रा. शिंदे यांनी डिप्रेस क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया पुणे या संस्थेची स्थापना १९०८ साली करुन शोषीत, पिडीत, दलित वर्गाच्या शिक्षणाची चळवळ सुरु केली. महर्षीच्या या चळवळीतून पुण्याच्या पूर्व भागात अस्पृश्य, दलित, शोषित, पीडित विद्यार्थ्यांच्या राहाण्याचा प्रश्न अहिल्याश्रम वसतीगृहाने सोडविला आणि प्राथमिक व शालेय शिक्षणासाठी शाळांचे एक जाळे विणले गेले. तरी या शाळज्ञतून – सामाजिक न्याय व बांधिलकीचे बाळकडू घेऊन तयार झालेल्या तरुणास महाविद्यालयीन शिक्षणाची सोय संस्थेकडे नव्हती. ही उणिव लक्षात घेऊन डि. सी. एम. चे सरचिटणीस मा. श्री. एम. डी. शेवाळे आणि अध्यक्ष डी. टी. रजपूत यांनी संस्थेच्या अमृत महोत्सवी वर्षात शासनाकडे पदवी महाविद्यालयाचा प्रस्ताव सादर केला. परंतू राजाश्रया अभावी शासनाची परवानगी सहज साध्य नसल्याचे लक्षात येताच मा. श्री. शेवळे सर व मा. श्री. रजपूत सर यांनी संघर्षाचा पवित्रा घेऊन हे महाविद्यालय मिळविले आणि १९ जून १९८४ पासून प्रारंभी वाणिज्य विद्याशाखा विना अनुदानीत सुरु केली. १९८९ पासून कला शाखा सुरु झाली. आज हे महाविद्यालय पूर्णपणे अनुदानीत असून महाविद्यालयात कला व वाणिज्य पदवीपर्यंतचे अभ्यासक्रम आहेत. कनिष्ठ विभागात ही कला व वाणिज्य विद्या शाखा आणि व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमाची सोय आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म. फुले, शाहू महाराज यांच्या सामाजिक व शैक्षणिक क्रांतीचा वारसा घेऊन विद्यार्थी घडविणयचे काम हे महाविद्यालय करीत आहे.

* महाविद्यालयाची वैशिष्ठ्ये *

१) आद्य समाजक्रांतीकारक म. फुले यांनी पुण्याच्या गंजपेठ, नानापेठेतून सामाजिक क्रांतीची सुरुवात केली ती पवित्र भूमी म्हणजे अहिल्याश्रमचा परिसर होय. या परिसरातच हे महाविद्यालय आहे.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पं. नेहरु, म. गांधी, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली ही भूमी आहे.

३) महर्षी शिंदे यांचे साकार झालेले स्वप्न म्हणजे अहिल्याश्रम.

४) पुण्याच्या पूर्व भागात बहुजन समाजाचे वास्तव्य असलेल्या मध्यवर्ती ठिकाणी, नाना पेठेत हे महाविद्यालय स्थापन झाले.

५) प्रशस्त क्रिडांगण, स्वतंत्र व भव्य इमारत असलेले हे महाविद्यालय आहे.

६) ज्या वास्तुत म. फुले यांनी १८५१ साली शाळा सुरु केली त्या वास्तुत महाविद्यालयाचे ग्रंथालय आहे.

७) ग्रंथालयात सर्व क्रमिक पुस्तके, संदर्भग्रंथ, वृत्तपत्रे, नियतकालिके व इतर वाडमय उपलब्ध आहे.

९) प्राध्यापकाचे वैयक्तिक लक्ष हे एक प्रमुख वैशिष्ठ्य आहे.

१०) शैक्षणिक गुणवत्ता वाढिबरोबर नोकरी व व्यवसाय विषयक मार्गदर्शन केले जाते.

CamScanner

महाविद्यालयामध्ये उपलब्ध असलेले अभ्यासेतर उपक्रम

१) एन. एस्. एस्. (सिनीयर, ज्युनियर व व्यवसाय शिक्षण)
२) एन. सी. सी. (सिनीयर)
३) सांस्कृतिक, कला व क्रिडा
४) विविध विषय / विद्याशाखा अभ्यास मंडळे
५) शिक्षक-पालक संघ

महाविद्यालयात खालीलप्रमाणे अभ्यसाक्रम शिकविले जातात.

पदवी अभ्यासक्रम - कला शाखा (बी. ए.)

१) बी. ए. पदवी अभ्यासक्रम त्रैवार्षिक असतो.
२) बी. ए. पदवीसाठी जो विशेष (स्पेशल) म्हणून घ्यावयाचा आहे तो बी. ए. प्रथम वर्षीच सामान्य (जनरल) स्तरावर अभ्यासावा लागतो.
३) या महाविद्यालयात मराठी, समाजशास्त्र, अर्थशास्त्र हे विषय विशेष (स्पेशल) स्तरावर शिकविले जातात.

बी. ए. प्रथम वर्ष -प्रवेश पात्रता

१) महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची १२ वी परिक्षा उत्तीर्ण झालेल्या कोणत्याही विद्यार्थ्यास बी. ए. प्रथम वर्ष वर्गात प्रवेश मिळेल.
२) जे विद्यार्थी महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण मंडळाची १२ वी ची परिक्षा बहिस्थ म्हणून उत्तीर्ण झाले असतील अशा विद्यार्थ्यांना बी. ए. प्रथम वर्गात प्रवेश मिळेल.

बी. ए. प्रथम वर्ष -विषय निवड प्रक्रिया

(खाली दर्शविलेल्या गट क्र. १ मधील विषय अनिवार्य आहेत. गट क्र. २ मधील पाच विषयांपैकी कोणतेही चार विषय निवडता येतील.)

गट क्र. १	गट क्र. २
इंग्रजी	समाजशास्त्र, राज्यशास्त्र
मराठी	अर्थशास्त्र, इतिहास, भूगोल

एस. वाय. ला जो विषय स्पेशल स्तरावर घ्यावयाचा आहे तो विषय जनरल स्तरावर एफ्.वाय. लाच घेणे आवश्यक आहे.

बी. ए. द्वितीय वर्ष -प्रवेश पात्रता

१) बी. ए. द्वितीय वर्षात प्रवेश घेण्यासाठी पुणे विद्यापिठाची बी. ए. प्रथम वर्षाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.
२) तथापि, ए.टी.के.टी. बाबत विद्यापीठाने घेतलेल्या निर्णयाचा लाभ घेऊन बी. ए. प्रथम वर्षाच्या दोन विषयात अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसही प्रवेश मिळतो.
३) मान्यताप्राप्त इतर विद्यापीठाची बी. ए. प्रथम वर्गाची परीक्षा उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यासही प्रवेश मिळतो. मात्र संबंधित विद्यापीठाचा स्थानांतर (मायग्रेशन) दाखला सोबत जोडणे आवश्यक आहे.

CamScanner

बी. ए. द्वितीय वर्ष -विषय निवड प्रक्रिया

१) बी. ए. द्वितीय वर्ष स्पेशल (विशेष) स्तरावरील अभ्यासक्रम सुरु होतो.

२) खाली दर्शविलेल्या गट क्र. १ मधील विषय अनिवार्य आहे. गट क्र. २ मधील विषयांपैकी कोणताही एक विषय स्पेशल म्हणून घेता येईल.

३) गट क्र. ३ मधील सहा विषयांपैकी कोणतेही २ विषय सामान्य स्तरावर निवडता येतील.

४) जो विषय स्पेशल स्तरावर घेतला आहे तो विषय जनरल स्तरावर घेणे आवश्यक आहे.

गट क्र. १ (अनिवार्य)	गट क्र. २ (स्पेशल पेपर कोणताही एक)	गट क्र. ३ (जनरल पेपर कोणतेही दोन)
इंग्रजी	मराठी	मराठी, समाजशास्त्र
	समाजशास्त्र	राज्यशास्त्र, अर्थशास्त्र
	अर्थशास्त्र	इतिहास, भूगोल

५) द्वितीय वर्षात निवडलेले विषय हे प्रथम वर्षात घेतलेले असावेत.

* द्वितीय वर्षासाठी पर्यावरण जागृती हा विषय अनिवार्य आहे.

बी. ए. तृतीय वर्ष - प्रवेश पात्रता

१) बी. ए. तृतीय वर्षात प्रवेश घेण्यासाठी पुणे विद्यापीठाची बी. ए. द्वितीय वर्षात परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

२) तथापि, ए.टी.के.टी. बाबत विद्यापीठाने घेतलेल्या निर्णयाचा लाभ घेऊन बी. ए. द्वितीय वर्षाच्या दोन विषयात अनुत्तीर्ण विद्यार्थ्यासही प्रवेश मिळतो.

३) मात्र बी. ए. प्रथम वर्षाच्या सर्व विषयात उत्तीर्ण असल्याशिवाय बी. ए. तृतीय वर्षात प्रवेश मिळू शकत नाही.

बी. ए. तृतीय वर्ष - निवड प्रक्रिया

१) ज्या विषयांची निवड बी. ए. द्वितीय वर्षात केली जाते तेच विषय बी. ए. तृतीय वर्षातही असतात.

आमच्या महाविद्यालयात मराठी विषयामध्ये एम.ए. भाग १ व भाग २ साठी प्रवेश सुरु आहेत.

एम.ए. भाग १ चे सत्र १ चे विषय	एम.ए. भाग १ चे सत्र २ चे विषय
व्यवहारिक व उपयोजित मराठी भाग १ (१०४३१)	व्यवहारिक व उपयोजित मराठी भाग २ (२०४३१)
अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (१०४३२) (इ.स. १८१८ ते १९२०)	अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (२०४३२) (इ.स. १९२० ते १९६०)
भाषाविज्ञान - वर्णनात्मक (१०४३३)	भाषाविज्ञान - सामाजिक (२०४३३)
ऐच्छिक विषय - ग्रामीण साहित्य (१०४३४)	ऐच्छिक विषय - दलित साहित्य (२०४३४)
एम.ए. भाग २ चे सत्र ३ चे विषय	**एम.ए. भाग २ चे सत्र ४ चे विषय**
प्रसार माध्यमे आणि साहित्यव्यवहार (३०४३१)	प्रसार माध्यमे आणि साहित्यव्यवहार (४०४३१)
साहित्य समीक्षा व संशोधन (३०४३२)	साहित्य समीक्षा व संशोधन (४०४३२)
विशेष लेखकाचा अभ्यास (३०४३३) (प्राचिन/अर्वाचिन)	विशेष लेखकाचा अभ्यास (४०४३३) (प्राचिन/अर्वाचिन)
ऐच्छिक विषय - लोकसाहित्याची मूलतत्त्वे आणि मराठी (३०४३४)	ऐच्छिक विषय - लोकसाहित्याची मूलतत्त्वे आणि मराठी (४०४३४)

वाणिज्य शाखा पदवी अभ्यासक्रम (बी. कॉम)

प्रथम वर्ष वाणिज्य (एफ.वाय.बी.कॉम.)

1) Functional English
2) Financial Accountancy
3) Business Economics (Micro)
4) Additional Marathi
5) Mathematics And Statistics
   OR
   Computer Concept and Programming
6) Office Mangaement
   OR
   Banking And Finance
7) Marketing And Salesmanship
   OR
   Business Environment And Entrepreneurship

द्वितीय वर्ष वाणिज्य (एस .वाय.बी.कॉम.)

1) Business Communication
2) Corporate Accounting
3) Business Economics (Macro)
4) Business Management
5) Corporate Law
6) Indian Banking System - Paper I
   OR
   Cost & Works Accounting - Paper I
   OR
   Marketing Management - Paper I
   OR
   Business Entrepreneurship

* द्वितीय वर्षासाठी पर्यावरण हा विषय अनिवार्य आहे.

तृतीय वर्ष वाणिज्य (टी.वाय.बी.कॉम.)

1) Business Regulatory Framework (M. Law)
2) Indian & Global Economics Development
3) Advanced Accountancy
4) Business Law and Taxation
5) Banking and Finance - Paper II
   OR
   Marketing and Publicity - Paper II
   OR
   Business Entrepreneurship - Paper II
   OR
   Cost and Work Accounting - Paper II
6) Banking and Finance - Paper III
   OR
   Marketing and Salesmanship - Paper III
   OR
   Business Entrepreneurship - Paper III
   OR
   Cost and Work Accounting - Paper III

CamScanner

वाणिज्य शाखा अभ्यासक्रम (एम. कॉम) - प्रथम वर्ष

SEMESTER - I

101 Management Accounting
102 Strategic Management
103 Advanced Accounting - **Special Paper I**
104 Income Tax - **Special Paper II**

SEMESTER - II

201 Financial Analysis and Control
202 Research Methodology for Business
203 Specialized Area in Accounting - **Special Paper III**
204 Business Tax Assessment and Planning Tax - **Special Paper IV**

वाणिज्य शाखा अभ्यासक्रम (एम. कॉम) - द्वितीय वर्ष

SEMESTER - III

301 Business Finance
302 Industrial Economics
303 Advance Auditing - **Special Paper V**
304 Specialized Auditing - **Special Paper VI**

SEMESTER - IV

401 Capital Market and Financial Service
402 Global Economic Environment
403 Recent Advances in Accounting, Taxation and Auditing - **Special Paper VII**
404 Project Work - **Special Paper VIII**

CamScanner

Junior College / कनिष्ठ महाविद्यालय

Standard XI / ११ वी

Arts / कला	Commerce / वाणिज्य
१. इंग्रजी	1. English
२. मराठी	2. Marathi
३. अर्थशास्त्र	3. Book Keeping Accountancy
४. भूगोल	4. Secretarial Practices
५. समाजशास्त्र	5. Organisation of Commerce
६. राज्यशास्त्र	6. Economics
किंवा	OR
सहकार	Co-Operation
७. पर्यावरण	7. पर्यावरण

नवीन सुधारीत अभ्यासक्रमानुसार विषय आहेत.

Standard XII / १२ वी

Arts / कला	Commerce / वाणिज्य
१. इंग्रजी	1. English
२. मराठी	2. Marathi
३. अर्थशास्त्र	3. Book Keeping Accountancy
४. भूगोल	4. Secretarial Practices
५. समाजशास्त्र	5. Organisation of Commerce
६. राज्यशास्त्र	6. Economics
किंवा	OR
सहकार	Co-Operation

CamScanner

व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम :

आजच्या व्यावसायिक जगामध्ये अत्यंत महत्त्वाचा आणि आवश्यक असा व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम आहे. या व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना पुस्तकी शिक्षणाबरोबरच प्रात्यक्षिकाद्वारे व्यावसायिक शिक्षणही दिले जाते. याशिवाय प्रात्यक्षिक विषयांची माहिती वेगवेगळ्या कंपन्या, बँका, संस्था, कार्यालये इ. प्रत्यक्ष भेटीद्वारे दिली जाते. हा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यामध्ये ॲप्रेन्टिसशिप पूर्ण करता येईल. तसेच शासनामध्ये ॲप्रेन्टिसशिपसाठी मान्यता मिळाली असल्याने विद्यार्थ्यांना विविध औद्योगिक क्षेत्रात नोकरीत संधी उपलब्ध झाल्या आहेत. तसेच स्वत:चे व्यवसाय सुरु करण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्र, पुणे यांचेकडून सहकार्य व मार्गदर्शन मिळते.

महाविद्यालयात हा अभ्यासक्रम १९९२ या वर्षापासून राबविला जात आहे. यात (१)ऑफिस मॅनेजमेन्ट (२) मार्केटिंग ॲण्ड सेल्समनशिप (३) अकौंटींग ॲण्ड ऑडिटींग हे कोर्स शिकवले जातात.

या अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये :

१) शासनमान्य अभ्यासक्रम
२) शासनमान्य ॲप्रेन्टिसशिप
३) प्रात्यक्षिक व प्रत्यक्ष भेटीवर भर
४) पात्रता इ. १० वी पास
५) कालावधी २ वर्षे
६) प्रवेश मर्यादा – २० विद्यार्थी / विद्यार्थीनी (प्रत्येक विषयासाठी)

M. C. V. C. XI / XII Subjects :

1. English
2. Marathi
3. General Foundation
4. Office Management (Three Papers)
5. Marketing and Salesmanship (Three Papers)
6. Accounting and Auditing (Three Papers)

नवीन सुधारित अभ्यासक्रमानुसार विषय आहेत.

CamScanner

प्रवेशाकरिता आवश्यक प्रमाणपत्र

१) मागील उत्तीर्ण परीक्षेचे गुणपत्रक - मूळ प्रत व चार झेरॉक्स प्रती (L.C. / T.C.)

२) मागील शाळा / महाविद्यालय सोडल्याच्या दाखल्याची मूळ प्रत व दोन झेरॉक्स प्रती.

३) एकदा प्रवेश घेतल्यानंतर कोणत्याही कारणासाठी दिलेली (L.C. / T.C.) परत मिळणार नाही. त्यामुळे सेवायोजन कार्यालयात नांव नोंदणीसाठी व अन्य कामासाठी पुरेशा सत्यप्रती (झेरॉक्स) काढून ठेवाव्यात.

४) मायग्रेशन / स्थानांतर प्रमाणपत्र जोडावे. (जर विद्यार्थ्याने राज्याबाहेरील बोर्ड / विद्यापीठ बदलले असेल किंवा राज्यातील विद्यापीठ बदलले असेल तरच)

५) फी सवलतीसाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांनी सक्षम अधिकाऱ्याच्या सहीचा उत्पन्नाचा दाखला जोडावा.

६) आवश्यक असल्यास जातीचा दाखला तोही सक्षम अधिकाऱ्याकडून प्रमाणित केलेला असावा.

७) आवश्यकतेप्रमाणे फी सवलतीसाठी प्राथमिक, माध्यमिक शिक्षकांचे, स्वातंत्र्य संग्राम सैनिकाचे पाल्य असल्यास व धरणग्रस्त, आपदग्रस्त असल्यास त्याबाबतचा सक्षम अधिकाऱ्याचा दाखला.

महाविद्यालयात उपलब्ध शिष्यवृत्ती सवलती व परितोषिके :

या महाविद्यासलयात प्रवेश घेतलेल्या व वर्गात नियमाप्रमाणे आवश्यक तेवढी उपस्थिती असलेली अनुसुचित जाती / जमाती / भटक्या विमुक्त जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती अर्ज केला असल्यास त्यांना भारत सरकारची शिष्यवृत्ती उपलब्ध आहे.

तसेच शिक्षकांचे पाल्य / स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य / अपंग / अंध यांना शासकीय नियमाने मिळणाऱ्या सर्व सवलती उपलब्ध आहेत.

CamScanner

महत्त्वाच्या सूचना पालक व विद्यार्थ्यांसाठी :

१) महाविद्यालयात कोणतीही संस्था / संघटना / मंडळ स्थापन करता येणार नाही. बाहेरच्या संघटनेचा प्रचार करता येणार नाही. तसेच महाविद्यालयात भिंती व सूचना फलक यावर बाहेरची भित्तीपत्रके, जाहिराती लावता येणार नाहीत. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या विरुद्ध कठोर कारवाई केली जाईल.

२) विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात सांस्कृतिक, शैक्षणिक वा इतर कार्यक्रम प्राचार्यांच्या पूर्व परवानगीनेच घडवून आणावेत.

३) विद्यार्थ्यांनी वर्गात नियमित उपस्थित असणे अवश्यक आहे. वर्ग चालू नसेल तेव्हा महाविद्यालयाच्या आवारात कोणतेही आक्षेपार्ह वर्तन करणे दंडनीय आहे. या सर्व बाबतीत शांततेचा भंग व उपद्रव होणार नाही असेच वर्तन करावे.

४) विद्यार्थ्यांनी भिंती, बाक व इतर फर्निचर व सूचना फलके व काचेच्या शोकेसेस, वीज कनेक्शन्स, वृक्ष व अन्य स्थावर मालमत्ता यांची मोडतोड किंवा हानी करु नये.

५) विद्यार्थ्यांनी आपले ओळखपत्र नेहमी सोबत ठेवावे. आवारात, वर्गात, ग्रंथालयात तसेच सांस्कृतिक, शैक्षणिक कार्यक्रमाच्या वेळी सभागृहात प्रवेशासाठी ओळखपत्र अत्यावश्यक आहे. प्राचार्य, प्राध्यापक, ग्रंथालय व कार्यालयीन अधिक्षक किंवा कर्मचाऱ्यांनी ओळखपत्राची मागणी केल्यास ते दाखविणे बंधनकारक आहे.

६) महाविद्यालयाच्या आवारात विद्यार्थ्यांचे इतरांशी असलेले वर्तन सभ्य व शिस्तीचे आसावे.

७) विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात होणाऱ्या सर्व सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रमांना हजर रहाणे आवश्यक आहे.

८) विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या आवारात आक्षेपार्ह वस्तू व शस्त्र बाळगता येणार नाहीत.

९) वरील सर्व सूचनांचे वेळोवेळी सूचना फलकावर लावलेल्या सूचनांचे आणि नियमांचे पालन करणे विद्यार्थ्यांवर बंधनकारक आहे.

१०) महाविद्यालयात कोणतेही गैरवर्तन, बेशिस्त खपवून घेतली जाणार नाही. वरील नियमांचा भंग केल्यास महाविद्यालयातून काढून टाकणे, कायदेशीर किंवा दंडात्मक कारवाई करणे याबाबतचे सर्व अधिकार प्राचार्यांना आहेत.

११) एकदा घेतलेला प्रवेश कोणत्याही कारणास्तव वार्षिक परीक्षा होईपर्यंत रद्द करता येणार नाही. डी.एड., आय.टी.आय. यासारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश मिळाला असल्यास प्रवेशपत्र दाखवून प्रवेश रद्द करता येईल. परंतू कोणत्याही कारणास्तव भरलेली फी परत मिळणार नाही.

CamScanner

१२) प्रवेशाच्या वेळी मूळ कागदपत्राखेरीज प्रवेश मिळणार नाही.

१३) महाविद्यालयाच्या कार्यालयात प्रवेशाच्या वेळी दाखल केलेले कोणतेही कागदपत्र (बोर्डाचे मूळ गुणपत्र व प्रमाणपत्र वगळता) कोणत्याही कारणास्तव विद्यार्थ्यांना परत मिळणार नाही. त्यामुळे पुढे आवश्यक वाटणाऱ्या प्रमाणपत्राच्या पुरेशा झेरॉक्स प्रती काढून ठेवाव्यात.

१४) ओळखपत्रावर प्राचार्यांची सही प्रवेशानंतर लगेचच घेणे आवश्यक आहे.

१५) ग्रंथालयाच्या वाचक कार्डावरील निर्धारित तारखेस पुस्तक जमा न केल्यास कमीत कमी रु. ५ किंवा रोज रु. १ या पैकी ज्यादा असेल तो दंड आकारला जाईल.

१६) महाविद्यालयाची सहामाही परीक्षा देणे आवश्यक आहे.

१७) १५ ऑगस्ट व २६ जानेवारी या राष्ट्रीय कार्यक्रमास उपस्थिती आवश्यक आहे.

पालकांसाठी सूचना :

१) मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार महाविद्यालयात कनिष्ठ विभाग / व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम आणि वरिष्ठ महाविद्यालयाकरिता शिक्षक पालक संघाची स्थापना केली जाईल.

२) शिक्षक पालक संघाच्या वर्षात होणाऱ्या सभांना पालकांनी उपस्थित रहाणे अपेक्षित आहे. पालकांच्या विधायक सूचनांचे स्वागत केले जाईल. याबाबत पालक प्राचार्यांना केंव्हाही भेटू शकतात.

३) महाविद्यालयात होणाऱ्या सहामाही व वार्षिक परीक्षेला बसणे आवश्यक आहे. गैरहजर विद्यार्थ्यांवर दंडात्मक कारवाई केली जाईल याची नोंद घ्यावी.

४) प्रथम वर्ष बी. ए. / बी. कॉम. च्या विद्यार्थ्यांनी सूचनेप्रमाणे वैद्यकीय तपासणी करुन घेणे आवश्यक आहे. नाहीतर विद्यार्थ्यांस परीक्षेस बसता येणार नाही. याची नोंद घ्यावी. पी. टी. ची परीक्षा देणे आवश्यक आहे.

५) आपला पाल्य नियमित कॉलेजमध्ये जातो की नाही याची पालकांनी स्वत: चौकशी करावी. परीक्षा फॉम / पात्रता फॉम / शिष्यवृत्ती अर्ज / फी माफी फॉम वेळेत भरला जातो की नाही याची काळजी घ्यावी.

CamScanner